मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 01 ऑक्टोबर 2026 | पान - 1


# मोशीत पुन्हा घुमणार ढोल-ताशांचा गजर!

## ४ ऑक्टोबरला ५ हजारांहून अधिक ढोलवादक देणार 'हिंदूभूषण'ला मानवंदना!

» पिंपरी | प्रतिनिधी

**मोशीतील बोऱ्हाडेवाडी येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रात रविवार, ४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता हजारो ढोल-ताशांचा निनाद घुमणार आहे. 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण'ला ऐतिहासिक मानवंदना देण्यासाठी हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड आणि ढोल-ताशा महासंघ, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.**



> "गतवर्षी झालेल्या ऐतिहासिक मानवंदनेची आठवण आजही ढोल-ताशा पथकांच्या मनात ताजी आहे. यंदा पाच हजारांहून अधिक वादक एकत्र येऊन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना मानवंदना देण्यासाठी सज्ज आहेत. सर्व पथकांचा एकत्रित निनाद हा या सोहळ्याचा सर्वात महत्त्वाचा क्षण असेल."
> -पराग ठाकूर, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष, ढोल-ताशा महासंघ.

यंदा पाच हजारांहून अधिक ढोलवादकांची नोंदणी पूर्ण झाली असून, महाराष्ट्रातील विविध ढोल-ताशा पथकांच्या भव्य सामूहिक वादनातून विश्वविक्रम नोंदवण्याचा आयोजकांचा संकल्प आहे. या ऐतिहासिक उपक्रमासाठी विविध पथकांकडून मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवण्यात आला आहे. या विक्रमाची अधिकृत पुष्टी कार्यक्रम पार पडल्यानंतर करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

याशिवाय पिंपरी-चिंचवडमध्ये उभारण्यात येत असलेल्या १२८ मीटर उंच भगव्या ध्वजालाही या सोहळ्यात विशेष मानवंदना देण्यात येणार आहे. हा जगातील सर्वात उंच भगवा ध्वज म्हणून ओळखला जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. त्यामुळे ढोल-ताशांचा गजर, 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण'ला मानवंदना आणि भगव्या ध्वजाला अभिवादन अशा विविध उपक्रमांमुळे यंदाचा सोहळा भव्य स्वरूपात पार पडणार आहे.

गतवर्षीच्या सोहळ्याला मिळालेल्या प्रतिसादानंतर यंदा अधिकाधिक ढोल-ताशा पथकांना एकत्र आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नियोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या तयारीला वेग आला असून, सहभागी पथकांकडून सामूहिक वादनासाठी सराव आणि नियोजन सुरू आहे. या सोहळ्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या संदर्भातील पत्रकार परिषदेला ढोल-ताशा महासंघाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष पराग ठाकूर, पुणे अध्यक्ष अक्षय बलकवडे, पिंपरी-चिंचवड अध्यक्ष विशाल मानकर, हिंदूभूषण स्मारक ट्रस्टचे उपाध्यक्ष गणेश महाराज भुजबळ आणि सदस्य प्रशांत वायकर उपस्थित होते.

> "धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या गौरवशाली स्मृतींना वंदन करण्यासाठी आणि निर्माणाधीन 'धर्मध्वज'ला ऐतिहासिक मानवंदना देण्यासाठी सोहळ्याचे आयोजन केले आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही शिव-शंभूप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. १२८ मीटर उंच उभारण्यात येत असलेल्या जगातील सर्वात उंच भगव्या ध्वजास हजारो ढोलवादकांच्या उपस्थितीत विश्वविक्रमी मानवंदना देण्याचा आमचा संकल्प आहे."
> -गणेश महाराज भुजबळ, उपाध्यक्ष, हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट.

# महापालिकेच्या सेवेतून २१ अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त!

» पिंपरी | प्रतिनिधी

**वर्षानुवर्षे निष्ठा, शिस्त आणि कर्तव्यभावनेने शहराची सेवा करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या योगदानामुळेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिका भक्कम पायावर उभी आहे, अशा शब्दांत सहआयुक्त मनोज लोणकर यांनी सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव केला.**



महापालिकेच्या वतीने मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत मधुकर पवळे सभागृहात सेवानिवृत्ती सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सप्टेंबर २०२६ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले १९ आणि स्वेच्छानिवृत्ती घेतलेले २ अशा एकूण २१ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सहआयुक्त मनोज लोणकर यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

सप्टेंबर २०२६ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्यांमध्ये उपअभियंता गणेश राऊत, कार्यालय अधीक्षक रमेश यादव, मुख्याध्यापक पुष्पा शिंदे, रजनी आहेर, अनुजा सोनगरे, मुख्य लिपिक रामू गेंगजे, रोहिणी ढेंबरे, सिस्टर इनचार्ज पौर्णिमा आमले, जलधारा टिपले, कॉम्प्युटर ऑपरेटर अरुण गुंडगळ, उपशिक्षक नीलिमा भांबेरे, सुनिता शेजवळ, रखवालदार बाळू लांडगे, लिफ्टमन विलास गायकवाड, मजूर हंसराज सजनियाल, लक्ष्मण मानमोडे, पांडुरंग गवारी, सफाई कामगार सविता काळभोर आणि नंदकुमार भोंडवे यांचा समावेश आहे.

तर स्वेच्छानिवृत्ती स्वीकारलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये सफाई कामगार राजेश गंगावणे आणि कचरा कुली गणेश यादव यांचा समावेश आहे. दीर्घकाळ महापालिका सेवेत योगदान दिल्याबद्दल सर्व सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांप्रती या वेळी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाला मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, मुख्य लिपिक माया वाकडे, नंदकुमार इंदलकर यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी-कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी मानले.

# पिंपरी-चिंचवडच्या प्रिथिका प्रदीपची ऐतिहासिक कामगिरी!

## एशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला तिरंदाजी संघाचा सुवर्णवेध!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवडच्या प्रिथिका प्रदीपने एशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई करत शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. एची-नागोया एशियाई क्रीडा स्पर्धेतील महिला कंपाऊंड धनुर्विद्या संघाने अंतिम सामन्यात बलाढ्य चीनचा 238-234 असा पराभव करत सुवर्णपदकावर नाव कोरले. भारतीय संघाच्या या ऐतिहासिक विजयात प्रिथिकाने महत्त्वपूर्ण योगदान दिले.**







भारतीय महिला संघात प्रिथिका प्रदीप, ज्योती सुरेखा वेन्नम आणि चिकिता तनीपार्थी यांचा समावेश होता. अंतिम सामन्यात भारतीय तिरंदाजांनी सुरुवातीपासूनच अचूक निशाणेबाजी करत चीनवर वर्चस्व राखले. भारताने मिळवलेले 238 गुण हे दक्षिण कोरियाने 2014 मध्ये नोंदवलेल्या जागतिक विक्रमाशी बरोबरी करणारे ठरले.

अंतिम फेरीपूर्वी उपांत्य सामन्यात भारताने दक्षिण कोरियाचा 234-233 असा अवघ्या एका गुणाने पराभव करत अंतिम फेरी गाठली होती. त्यानंतर अंतिम सामन्यातही भारतीय महिलांनी संयम, अचूकता आणि कौशल्याचे दर्शन घडवत सुवर्णपदकावर मोहोर उमटवली. विशेष म्हणजे, भारतीय महिला कंपाऊंड संघाने एशियाई क्रीडा स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक जिंकण्याची ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

ज्योती सुरेखा वेन्नम यांचे हे एशियाई क्रीडा स्पर्धेतील चौथे सुवर्णपदक ठरले, तर प्रिथिका प्रदीप आणि चिकिता तनीपार्थी यांनी आपल्या पहिल्याच एशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याचा मान मिळवला. प्रिथिकाच्या या यशामुळे पिंपरी-चिंचवडचे नाव आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात अभिमानाने झळकले आहे.

पिंपरी-चिंचवड आर्चरी असोसिएशनच्या माध्यमातून शहरात गेल्या अनेक वर्षांपासून धनुर्विद्येच्या विकासासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना या यशामुळे मोठी प्रेरणा मिळाली आहे. शहरातून घडलेली खेळाडू एशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करून सुवर्णपदक जिंकते, ही पिंपरी-चिंचवडसाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे. तिच्या या कामगिरीमुळे महाराष्ट्रासह देशभरातील युवा धनुर्धारकांना प्रेरणा मिळणार आहे.

प्रिथिकाच्या यशामागे प्रशिक्षक कुणाल टावरे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, तांत्रिक प्रशिक्षण आणि मेहनत महत्त्वाची ठरली. त्याचबरोबर पालकांनी दिलेला विश्वास, पाठिंबा आणि प्रोत्साहनही तिच्या यशाचे महत्त्वाचे आधारस्तंभ ठरले.

महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेच्या सहसचिव तथा पिंपरी-चिंचवड आर्चरी असोसिएशनच्या सचिव सोनल बुंदेले यांनी प्रिथिकाच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला. प्रिथिकामधील गुणवत्ता आणि विशेष टॅलेंट शालेय वयातच ओळखता आले. तिची जिद्द, मेहनत, शिकण्याची तयारी आणि खेळाप्रती असलेली निष्ठा आज तिला एशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदकापर्यंत घेऊन गेली, असे त्यांनी सांगितले.

प्रिथिकाची मेहनत, प्रशिक्षक कुणाल टावरे यांचे मार्गदर्शन आणि पालकांचा भक्कम पाठिंबा यामुळे हे यश शक्य झाले असून, तिच्या कामगिरीमुळे अनेक युवा खेळाडूंना प्रेरणा मिळेल, असेही बुंदेले यांनी नमूद केले. भविष्यात पिंपरी-चिंचवड आर्चरी असोसिएशनच्या माध्यमातून गुणवंत खेळाडूंना योग्य प्रशिक्षण आणि संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरूच राहतील, असे त्यांनी सांगितले.

# पिंपरी-चिंचवड भाजपाच्या सरचिटणीसपदी संजय पटनी!

» पिंपरी | प्रतिनिधी

**भारतीय जनता पार्टीच्या पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा सरचिटणीसपदी संजय पटनी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. प्रसिद्धीप्रमुख आणि वरिष्ठ उपाध्यक्ष अशा विविध पदांवर काम केलेल्या पटनी यांच्यावर पक्षाने आता सरचिटणीसपदाची जबाबदारी सोपवली आहे.**




संजय पटनी यांनी गेल्या दोन दशकांमध्ये भाजपाच्या विविध कार्यक्रमांमध्ये तसेच संघटनात्मक उपक्रमांमध्ये सातत्याने सक्रिय सहभाग घेतला आहे. भाजपा परिवारातील विविध संस्था आणि संघटनांच्या कार्यातही त्यांनी योगदान दिले आहे. शहरातील राजस्थानी, मारवाडी आणि हिंदीभाषिक समाजातील विविध घटकांशी त्यांचा व्यापक जनसंपर्क असून, या माध्यमातून त्यांनी पक्षाशी विविध समाजघटकांचा संवाद वाढवण्याचे काम केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचे भोसरी विधानसभा मतदारसंघातील सर्व ४८३ बूथवर सलग चार महिने शंभर टक्के यशस्वी आयोजन करण्यात पटनी यांनी महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला होता. बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांशी समन्वय साधत कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन प्रभावीपणे करण्यासाठी त्यांनी योगदान दिले.

पटनी यांच्या नियुक्तीबद्दल आमदार महेश लांडगे यांनी आनंद व्यक्त केला. गेल्या दोन दशकांतील पटनी यांची साथ, निःस्वार्थ पक्षकार्य आणि कार्यकर्त्यांशी असलेले आत्मीय संबंध मोलाचे असल्याचे लांडगे यांनी सांगितले. त्यांच्या निष्ठेला आणि समर्पित पक्षकार्याला पक्षश्रेष्ठींनी योग्य न्याय दिला असून, पटनी यांच्या अनुभवाचा आणि व्यापक जनसंपर्काचा शहरातील पक्षसंघटनेला लाभ होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

नियुक्तीनंतर संजय पटनी यांनी पक्ष नेतृत्व, आमदार महेश लांडगे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे तसेच सहकारी पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार मानले. पक्षाने दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

शहरातील पक्षसंघटना अधिक मजबूत करणे, विविध समाजघटकांशी संवाद वाढवणे आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करणे याला प्राधान्य देणार असल्याचे पटनी यांनी सांगितले. त्यांच्या नियुक्तीनंतर पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस विकासजी डोळस, मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे, नगरसेवक उदय गायकवाड, नगरसेवक सागर गवळी यांच्यासह पदाधिकारी आणि सहकारी उपस्थित होते.

### पटनींचा निर्धार

सरचिटणीसपदाची नवी जबाबदारी स्वीकारल्यानंतर पक्षसंघटना अधिक मजबूत करणे, विविध समाजघटकांशी संवाद वाढवणे आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करण्याला प्राधान्य देणार असल्याचे संजय पटनी यांनी सांगितले. पक्षनेतृत्वाने दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

### दोन दशकांच्या पक्षकार्याची दखल

संजय पटनी यांनी गेल्या २० वर्षांपासून भाजपाच्या विविध संघटनात्मक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. बूथस्तरावरील कार्यकर्त्यांशी समन्वय साधण्यासोबतच विविध समाजघटकांमध्ये पक्षाचा जनसंपर्क वाढवण्यासाठी त्यांनी काम केले आहे. 'मन की बात' कार्यक्रमाचे भोसरी मतदारसंघातील ४८३ बूथवर सलग चार महिने यशस्वी आयोजन करण्यातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# जिल्हा परिषद शाळांत आता 5 परकीय भाषा!

## २४० शिक्षकांना १८० तासांचे प्रशिक्षण; विद्यार्थ्यांना मिळणार जागतिक भाषांची ओळख

**» पुणे | प्रतिनिधी**

**जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना जागतिक भाषा आणि विविध संस्कृतींची ओळख व्हावी, यासाठी पुणे जिल्हा परिषद आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परकीय भाषा विभागाने परकीय भाषा शिक्षण उपक्रमाचा विस्तार केला आहे. उपक्रमाच्या दुसऱ्या वर्षात यंदा पाच परकीय भाषांसाठी तब्बल २४० शिक्षकांना प्रशिक्षण दिले जात आहे.**




विद्यापीठाच्या परकीय भाषा विभागामार्फत २१ सप्टेंबरपासून जिल्हा परिषदेच्या शिक्षकांसाठी ऑनलाइन प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले आहेत. यामध्ये जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश, रशियन आणि जपानी या पाच भाषांचा समावेश आहे. पहिल्या वर्षी केवळ दोन भाषांसाठी १०२ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले होते. यंदा भाषांची संख्या दोनवरून पाच, तर प्रशिक्षणार्थी शिक्षकांची संख्या १०२ वरून २४० करण्यात आली आहे.

यंदा जर्मन भाषेसाठी १३२, फ्रेंचसाठी २८, स्पॅनिशसाठी २५, रशियनसाठी २५ आणि जपानी भाषेसाठी ३० शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. या शिक्षकांना एकूण १८० तासांचा संरचित भाषा अभ्यासक्रम शिकवला जात आहे. भाषेतील ऐकणे, वाचन, लेखन आणि बोलणे या चार प्रमुख कौशल्यांवर प्रशिक्षणामध्ये विशेष भर देण्यात आला आहे.

अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर शिक्षकांना संबंधित भाषेतील दैनंदिन संभाषण समजून घेणे, साधे मजकूर वाचणे, प्राथमिक स्वरूपात संवाद साधणे तसेच छोटे निबंध लिहिण्याची कौशल्ये आत्मसात करता येणार आहेत. त्यानंतर हे प्रशिक्षित शिक्षक आपल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना संबंधित परकीय भाषा आणि त्या भाषेशी निगडित संस्कृतीची प्राथमिक ओळख करून देणार आहेत.

हा उपक्रम 'प्रशिक्षकांचे प्रशिक्षण' (TRAINING OF TRAINERS) या संकल्पनेवर आधारित आहे. म्हणजेच विद्यापीठाकडून प्रशिक्षण घेतलेले शिक्षक पुढे आपल्या शाळांतील विद्यार्थ्यांपर्यंत हे ज्ञान पोहोचवणार आहेत. पहिल्या वर्षी प्रशिक्षण घेतलेल्या १०२ शिक्षकांनी प्रत्येकी सुमारे ५० विद्यार्थ्यांपर्यंत परकीय भाषा आणि संस्कृतीचे ज्ञान पोहोचवले. त्यामुळे अंदाजे ५ हजार १०० विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा थेट लाभ मिळाला आहे.

यंदा शिक्षकांची संख्या वाढविण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणाऱ्या या उपक्रमाची व्याप्ती आणखी वाढणार आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना केवळ स्थानिक अभ्यासक्रमापुरते मर्यादित न ठेवता त्यांना विविध देशांच्या भाषा आणि संस्कृतीशी परिचित करून देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे.

परकीय भाषांच्या अभ्यासामुळे विद्यार्थ्यांच्या भाषिक जाणिवेला आणि संवादकौशल्याला चालना मिळण्यास मदत होते. त्याचबरोबर वेगवेगळ्या भाषा, संस्कृती आणि जीवनपद्धती समजून घेण्याची दृष्टी विकसित होण्यासही हातभार लागतो. आपल्या परिसराच्या पलीकडील जग समजून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना या उपक्रमातून मिळत आहे.

जिल्हा परिषद आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा हा संयुक्त उपक्रम विद्यार्थ्यांना भविष्याभिमुख शिक्षणाशी जोडण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरत आहे. पाच परकीय भाषांची प्राथमिक ओळख शालेय स्तरावरच करून दिल्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्याबरोबरच त्यांच्यामध्ये व्यापक जागतिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होणार आहे.

# ४० वर्षांची प्रतीक्षा संपणार; एचसीएमटीआरला नोव्हेंबरमध्ये सुरुवात!

**» पुणे | प्रतिनिधी**

**शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी गेल्या चार दशकांपासून चर्चेत असलेल्या उच्च क्षमता द्रुतगती वर्तुळाकार मार्गाला (एचसीएमटीआर) अखेर प्रत्यक्ष कामाची दिशा मिळाली आहे. नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात या प्रकल्पासाठी दोन निविदा काढण्यात येणार असून, त्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी ही माहिती दिली.**



एचसीएमटीआरच्या पहिल्या दोन टप्प्यांमध्ये सिंहगड रस्ता आणि विमाननगर परिसरातील मार्गांचा समावेश करण्यात आला आहे. या दोन्ही टप्प्यांसाठी प्रत्येकी सुमारे दोन हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, प्रकल्पासाठी महापालिका कर्ज घेणार आहे. त्यासाठी आर्थिक नियोजन आणि आवश्यक प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, कर्ज उभारणीसाठी सल्लागार नियुक्त करण्याची तयारीही महापालिकेने सुरू केली आहे. सल्लागार नियुक्तीसाठीची जाहिरात गेल्या आठवड्यात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

पुणे शहराचा चारही दिशांनी झपाट्याने विस्तार होत असताना लोकसंख्येतही मोठी वाढ झाली आहे. मात्र, त्या तुलनेत शहरातील अनेक प्रमुख रस्ते अरुंद आणि अपुरे असल्याने वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. या पार्श्वभूमीवर एचसीएमटीआरबरोबरच शहराभोवती रिंग रोड उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. वाहतूक व्यवस्थेला मोठा दिलासा देण्यासाठी हे दोन्ही प्रकल्प महत्त्वाचे मानले जात आहेत.

एचसीएमटीआरचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) डिसेंबरपर्यंत तयार करण्याचे नियोजन आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी करताना आवश्यक जमीन संपादन, सरकारी जागा आणि खासगी जागा यांचा स्वतंत्र विचार करण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी तब्बल ४ लाख ९८ हजार ३९० चौरस मीटर जमीन संपादित करावी लागणार आहे. त्यासाठी अंदाजे २ हजार ६३४ कोटी रुपयांची नुकसानभरपाई अपेक्षित आहे.

एचसीएमटीआरच्या प्रस्तावित मार्गामध्ये बोपोडी, औंध, भांबुर्डा, एरंडवणा, कोथरूड, हिंगणे, पर्वती, वानवडी, हडपसर, मुंढवा, वडगाव शेरी, लोहगाव, येरवडा आणि धानोरी यांसह विविध भागांचा समावेश आहे. या मार्गासाठी काही सरकारी जागांचीही आवश्यकता भासणार आहे. संबंधित सरकारी विभागांच्या जागांचा एकत्रित प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविल्यानंतर त्या जागा विनामोबदला उपलब्ध करून देण्याचे आश्वासन राज्य सरकारकडून देण्यात आल्याची माहिती महापालिकेने दिली आहे.

पहिल्या दोन टप्प्यांमध्ये महापालिकेच्या ताब्यात असलेल्या जागांवर प्रामुख्याने काम सुरू केले जाणार आहे. सिंहगड रस्ता, वडगाव बुद्रुक, सातारा रस्ता, बिबवेवाडी, मार्केट यार्ड आणि लुल्लानगर या भागातून सुमारे १० किलोमीटरच्या मार्गाचे काम प्रस्तावित आहे. दुसऱ्या टप्प्यात विमाननगर चौक, विश्रांतवाडी, बॉम्बे सॅपर्स आणि खडकी या भागातून सुमारे १२ किलोमीटरचा मार्ग विकसित केला जाणार आहे.

या दोन्ही टप्प्यांतील कामासाठी काही खासगी जागा संपादित कराव्या लागणार आहेत. संबंधित जागा ताब्यात घेण्यासाठी आवश्यक प्रक्रिया आणि नियोजन महापालिकेकडून सुरू आहे. जमीन संपादनाची प्रक्रिया, आर्थिक नियोजन आणि निविदा प्रक्रिया यांचा समन्वय साधून प्रकल्पाला गती देण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून कागदावर आणि चर्चेत राहिलेल्या एचसीएमटीआर प्रकल्पाला आता निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून प्रत्यक्ष सुरुवात करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे नोव्हेंबरमध्ये निविदा निघाल्यानंतर पुण्याच्या वाहतूक व्यवस्थेतील या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला प्रत्यक्ष गती मिळणार आहे.

# लग्नाला नकार देताच प्रेयसीवर चाकूने सपासप वार!

## भररस्त्यात तरुणीवर हल्ला करून स्वतःच्या जीवाचेही टोकाचे पाऊल; प्रियकरावर गुन्हा दाखल!




**» पिंपरी | प्रतिनिधी**

**लग्न करण्यास नकार दिल्याच्या रागातून प्रियकराने प्रेयसीवर भररस्त्यात धारदार चाकूने सपासप वार करून तिला जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना हिंजवडी परिसरात घडली. विशेष म्हणजे, तरुणीवर हल्ला केल्यानंतर आरोपी प्रियकराने स्वतः उंदीर मारण्याचे औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. जखमी तरुणीवर उपचार सुरू असून, तिच्या फिर्यादीवरून हिंजवडी पोलिसांनी आरोपी प्रियकराविरोधात गुन्हा दाखल केला आहे. आरोपीवरही खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी २४ वर्षीय तरुणी हिंजवडी परिसरातील एका खासगी कंपनीत नोकरी करते. गेल्या सुमारे एक वर्षापासून तिचे आरोपी तरुणासोबत प्रेमसंबंध होते. दोघांमध्ये काही कारणावरून मतभेद निर्माण झाले होते. सोमवारी पहाटे तरुणी तिच्या बहिणीसोबत कामावर जाण्यासाठी निघाली होती. त्यावेळी आरोपीने तिचा रस्ता अडवला आणि तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला.

यावेळी आरोपीने 'तुझ्यामुळे मला कामावरून काढून टाकले आहे. तू माझ्याशी का बोलत नाहीस? आपण लग्न करू,' असे म्हणत तरुणीशी वाद घातला. मात्र, तरुणीने त्याच्यासोबत लग्न करण्यास स्पष्ट नकार दिला.

लग्नास नकार दिल्याने आरोपी संतापला. त्याने तरुणीला खाली पाडले आणि जवळ असलेल्या धारदार चाकूने तिच्यावर हल्ला करण्यास सुरुवात केली.

आरोपीने तरुणीच्या छातीवर, पाठीवर तसेच हातावर चाकूने अनेक वार केले. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे तरुणी गंभीर जखमी झाली. तिच्यासोबत असलेल्या बहिणीसह परिसरातील नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. त्यानंतर जखमी तरुणीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दरम्यान, तरुणीवर हल्ला केल्यानंतर आरोपीनेही टोकाचे पाऊल उचलत उंदीर मारण्याचे औषध प्राशन केले. त्याची प्रकृती बिघडल्यानंतर त्यालाही उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच हिंजवडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तरुणीच्या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला असून, घटनेचा पुढील तपास फौजदार ताकतोडे करीत आहेत.

# व्हिसा संपला, तरी भारतात मुक्काम; अफगाण विद्यार्थी पोलिसांच्या ताब्यात!



**» पुणे | प्रतिनिधी**

**विद्यार्थी व्हिसावर भारतात आलेल्या अफगाणिस्तानच्या २६ वर्षीय विद्यार्थ्याची भारतात वास्तव्य करण्याची परवानगी तब्बल आठ महिन्यांपूर्वी संपलेली असतानाही तो कोणतीही मुदतवाढ न घेता बावधन परिसरात वास्तव्यास असल्याचे आढळून आले. पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या दहशतवाद विरोधी शाखेने (एटीबी) परकीय नागरिक नोंदणी विभागाच्या (एफआरओ) मदतीने सोमवारी (दि. २८ सप्टेंबर) कारवाई करत त्याला ताब्यात घेतले. दानयार हुसैन (वय २६, मूळ रा. अफगाणिस्तान) असे ताब्यात घेतलेल्या विद्यार्थ्याचे नाव असून, त्याला मायदेशी पाठविण्याची (डिपोर्टेशन) प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.**

शहरात परवानगीची मुदत संपल्यानंतरही वास्तव्य करणाऱ्या परदेशी नागरिकांचा शोध घेऊन त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी दहशतवाद विरोधी शाखेला दिल्या आहेत. त्यानुसार एटीबी आणि एफआरओकडून शहरातील परदेशी नागरिकांच्या वास्तव्याची माहिती संकलित करून त्याची पडताळणी केली जात आहे. या तपासादरम्यान दानयार हुसैन याच्या भारतातील वास्तव्याबाबत पोलिसांना माहिती मिळाली.

पोलिस उपायुक्त धीरज पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, दानयार हुसैन हा बावधन परिसरातील एका सोसायटीत राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर दहशतवाद विरोधी शाखेचे पोलिस निरीक्षक विकास राऊत यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण तसेच गोपनीय माहितीच्या आधारे त्याचा ठावठिकाणा शोधला. त्यानंतर एटीबी, एफआरओ आणि बावधन पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई करत त्याला ताब्यात घेतले.

पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर हुसैन याच्याकडे असलेल्या कागदपत्रांची सखोल तपासणी करण्यात आली. चौकशीदरम्यान तो शिवाजीनगर येथील मॉडर्न कॉलेजमध्ये एम.ए. (अर्थशास्त्र) द्वितीय वर्षात शिक्षण घेत असल्याचे समोर आले. मात्र, जानेवारी २०२६ पासून तो महाविद्यालयात गैरहजर असल्याचेही तपासात निष्पन्न झाले.

दरम्यान, त्याचा पासपोर्ट २६ जून २०२७ पर्यंत वैध असल्याचे कागदपत्रांच्या पडताळणीत स्पष्ट झाले. मात्र, पासपोर्ट वैध असला तरी भारतात विद्यार्थी व्हिसाच्या आधारे वास्तव्य करण्याची त्याची परवानगी केवळ ३१ जानेवारी २०२६ पर्यंतच होती. त्यानंतर त्याने भारतात राहण्यासाठी कोणतीही मुदतवाढ घेतली नसल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले. त्यामुळे परवानगीची मुदत संपल्यानंतरही भारतात वास्तव्य केल्याने तो 'ओव्हरस्टे' असल्याचे निष्पन्न झाले.

या कारवाईत विशेष शाखेचे पोलिस उपायुक्त धीरज पाटील, परकीय नागरिक नोंदणी विभागाचे (एफआरओ) वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय वाघमारे, दहशतवाद विरोधी शाखेचे पोलिस निरीक्षक विकास राऊत यांच्या पथकाने सहभाग घेतला. बावधन पोलिसांच्या मदतीने ही संयुक्त कारवाई करण्यात आली.

दरम्यान, परदेशी नागरिक एखाद्या रूम, फ्लॅट, बंगला किंवा हॉटेलमध्ये वास्तव्यास आल्यास संबंधित घरमालक अथवा व्यवस्थापनाने त्याची माहिती 'सी-फॉर्म'द्वारे २४ तासांच्या आत परकीय नागरिक नोंदणी विभागाला (एफआरओ) देणे बंधनकारक आहे. परदेशी नागरिकाच्या वास्तव्याची माहिती निर्धारित वेळेत न दिल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.

शहरातील नागरिकांनी आपल्या परिसरात परदेशी नागरिक अनधिकृतपणे वास्तव्यास असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत तातडीने एफआरओ किंवा दहशतवाद विरोधी शाखेला माहिती द्यावी, असे आवाहन पिंपरी-चिंचवड पोलिसांनी केले आहे.